प्रकरण 1 ले

भूमिका

पृष्ठ 1 ते 2.

# * प्रकरण – 1 ले *

## – भूमिका –

"बाइदेवबासचरित्र व वाड्.मय" हा विषय एम्. फिल. च्या प्रबंधिकेसाठी निवडण्यात आला तो मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांच्याशी सल्ला मसलत करुनच.

बी. ए. ला असताना लीळाचरित्रात अगदी ओझरता असा बाइदेवांचा उल्लेख ऐकला होताच. शिवाय एम. ए. ला "स्मृतिस्थळांमध्ये बाइदेवांचे जे काही थोडके उल्लेख आले त्यातून त्यांचे मितभाषीत्व व भावनाप्रधान व्यक्तिमत्व तसेच महानुभाव पंथावरील व गुरुवरील अनन्य निष्ठा व भक्तिपोटी जे आत्मीयत्व दिसले त्याने लक्ष वेधून घेऊन या अभ्यासास प्रवृत्त झाले. बाइदेवांच्या वाड्.मयावर साधकबाधक चर्चा, लेखन झालेले दिसत नाही. महानुभावांच्या जीवनात त्यांचे वाड्.मय महत्वाचे स्थान घेऊन बसले आहे. तरीही एक महानुभावीय ग्रंथकार म्हणून त्यांच्याकडे फारसे कुणाचे लक्ष गेलेले दिसत नाही. अपवाद म्हणजे के. सी. क–हाडकर यांनी त्यांच्यावर लेखन केले आहे. मात्र इतरत्र कुठेही बाइदेवबासांवर जास्त प्रकाश टाकलेला दिसत नाही. महानुभाव पंथात इतके समरस होऊनही व आपल्या भाषेचे प्रभुत्व दाखवून चांगले वाड्.मय लिहूनही ते अजून मराठी अभ्यासकांना व्यासंगाने अभ्यासावे वाटलेले दिसत नाही. त्यामुळे या महानुभावीय ग्रंथकाराचा सादर अभ्यास करुन तो अभ्यासकांपुढे मांडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न.

बाइदेवबासांच्या नावावर असणारी सर्व वाड्.मयीन संपदा ही गद्य स्वरुपातच आहे. महानुभावीय वाड्.मयातून त्यांचे वाड्.मय वेगळे काढता येणार नाही, ज्याप्रमाणे साहित्यातून जीवन वेगळे काढता येणार नाही, तर त्यातच ते कसे गुंफले गेले आहे हे मात्र पाहता येते. महानुभावीय वाड्.मय अर्थात मराठी वाड्.मय समृद्ध करण्यात बाइदेवबासांच्या लेखनाचाही मोलाचा वाटा आहे. "पूजावसर" "प्रसादसेवा" "मूर्तिज्ञान" व "नामाचे दहा ठाय" हा त्यांच्या ग्रंथरचना चक्रधरांवर त्यांची असणारी अनन्यनिष्ठा, भोळा भक्तिभाव व कमालीची विरक्ती यांची जाणीव तर करुन देतातच शिवाय त्या पंथावरची त्यांची आत्मीयताही प्रकट करतात.

प्रस्तुत प्रबंधिकेत बाइदेवबासांचे चरित्र, व्यक्तिमत्व सजवून त्यांच्या वाड्.मयीन रचनाचे महात्म्य स्पष्ट केले आहे. बाइदेवांच्या ग्रंथातील दृष्टान्ताची यथायोग्य मांडणी, स्थानांचे तपशिलाने वर्णन, चक्रधरांची दैनंदिनी, मूर्तीचे ध्यान, नामस्मरण, वंदन या विशेषांनी, सोप्या भाषा संभाराने व ओघवत्या शैलीने त्यांचे वाड्.मय आपले वेगळेपण दाखविते. म्हणून एक महानुभावीय ग्रंथकार म्हणून बाइदेवांच्या ग्रंथरचना अभ्यासनीय वाटतात.

निखळ संशोधनाच्या भूमिकेतून व बाइदेवबासांच्या महानुभाव पंथावर असणा--या अनन्य निष्ठेला प्रणाम करण्यासाठी त्यांचे वाड्.मय अभ्यासनीय वाटले. व हा विषय निवडण्यामुळे आनंदही झाला. मार्गदर्शकांनीही उत्तम मार्गदर्शनाने तो सजविला. अर्थात् प्रस्तुत अभ्यासाविषयीची निवड करण्यापासून प्रबंधिकेला पूर्णत्व प्राप्त करुन देण्यापर्यंत माझे माननीय व आदरणीय मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप, प्रपाठक व मराठी विभागप्रमुख, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड यांनी जे बहुमोल मार्गदर्शन व स्वतः कष्ट घेऊन चांगले सहकार्य केले तसेच वेळोवेळी प्रबंधिका पूर्ततेसाठी प्रेरणा देण्याने ही प्रबंधिका पूर्णत्वापर्यंत पोहोचली म्हणून प्रथम त्यांचे आभार मानण्यात आद्य कर्तव्य होय.

एम्. फिल. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे सन्माननीय प्राचार्य ई. जी. निकम, सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यांची मी ऋणी आहे. तसेच प्रा. सुमनताई पाटील, प्रा. सौ. सूर्यमाला जाधव, प्रा. बी. पी. पाटील, प्रा. सौ. सरला निकम, व प्रा. सौ. शोभना रैनाक यांचे सुयोग्य सहकार्य मिळाल्यबद्दल त्यांचीही मी आभारी आहे.

प्रबंधिकेसाठी आवश्यक महत्वाची अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी "सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराडचे ग्रंथाल्य, महिला महाविद्यालय, कराड चे ग्रंथालय व कराड नगरपरिषद कराडचे ग्रंथालय यांचे त्या त्या ग्रंथालयाच्या ग्रंथपालांचे व त्यांच्या सहका--यांचे मी मनःपूर्वक आभार मानते.